# 4.2.3

**4.2.3 Average annual expenditure for purchase of books/ e-books and subscription to journals/e-journals during the last five years (INR in Lakhs)**

4.2.3.1: Annual expenditure for purchase of books and journals year wise during the last five years (INR in lakhs)

| Sr. No. | Particulars | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | University Fund | 1710393 | 199812 | 108620 | 2985603 | 3467237 |
| 2. | UGC Fund | 225000 | 603985 | -- | -- | 76883 |
| 3. | RUSA Fund | -- | 7670029 | 5608320 | 4917203 | -- |
| | Total | 1935393 | 8473826 | 5716940 | 7902806 | 3544120 |

Average Annual Expenditure for purchase of Books and Journal= Rs. 5514617

Finance & Accounts Officer
Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University Solapur

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited 2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## ज्ञानस्त्रोत समितीची २१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

ज्ञानस्त्रोत समितीची २१ वी बैठक दिनांक २३/१०/२०१९ रोजी दुपारी ०४:०० वाजता व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरु महोदया | अध्यक्षा |
| २. | प्रा. डॉ. बी. म. पांनगे | सदस्य |
| ३. | प्रा. डॉ. वि. भा. घुटे, कुलसचिव | सदस्य |
| ४. | सीए. श्रेणिक शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ५. | प्रा. डॉ. श. शि. सुर्यवंशी | सचिव |

**स्वागत :**

प्रा. डॉ. श. शि. सुर्यवंशी, सचिव, ज्ञानस्त्रोत केंद्र समिती यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने या बैठकीचा कामकाजास सुरुवात केली व त्यांनी मा. अध्यक्ष व ज्ञानस्त्रोत समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती :**

ज्ञानस्त्रोत समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. के. ए. पांडे, डॉ. डी. डी. कुलकर्णी व श्री. राम रेड्डी यांनी काही अपरिहार्य कारणास्तव सदर बैठकीस उपस्थित राहू शकणार नसल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीचे नोंद घेण्यात आली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## ज्ञानस्त्रोत समितीची २१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

### वार : बुधवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१९ रोजी दुपारी ०४:०० वाजता

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | १. | दि.२३ एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या ज्ञानस्त्रोत समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यालयाने त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. | सहपत्र पान क्र. १५ ते २२ |
| २) | २. | सन २०१८-१९ या वर्षाचा ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यास केंद्राचा वार्षिक अहवाल माहितीस्तव. | - |
| ३) | ३. | सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राकडील अंदाजपत्रकाचे विवरण माहीतीस्तव. | - |
| ४) | ४. | सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यासकेंद्रासाठी पुस्तके व नियतकालिके खरेदी करणे संदर्भातील मार्गदर्शक तत्वे ठरविण्याबाबत सहपत्र जोडलेले आहे. | २३ ते ३२ |
| ५) | ५. | अभ्यासकेंद्राकडील मुलींच्या अभ्यासिकेची वेळ वाढविणेबाबत. | ३३ |
| ६) | ६. | दुर्मिळ पुस्तके स्कॅनिंग करुन वापरात आणण्यासाठी विद्यापीठ संकुलातील शिक्षकांची समिती स्थापन करुन मिळणेबाबत. | - |
| ७) | ७. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील कलम. क्र.२१ (४)(छ) नुसार विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्थाच्या ग्रंथपालाची वार्षिक बैठक आयोजित करण्याची बाब विचारार्थ. | - |
| ८) | ८. | ज्ञानस्त्रोत केंद्राकडील संगणक कक्षाच्या वापराबाबत. | ३४ |
| ९) | ९. | विद्यापीठामध्ये नव्याने सुरु होणाऱ्या संकुलाच्या माहितीबाबत. | - |
| १०) | १०. | ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्राबाबत. | - |
| ११) | ११. | ज्ञानस्त्रोत केंद्राकडून शिक्षकांना, कं. शिक्षक व कायम शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वाचनासाठी देण्यात येणा-या पुस्तकांबाबत | - |
| १२) | १२. | मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळीचे विषय. | - |

०१ ] दि.२३ एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या ज्ञानस्त्रोत समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यालयाने त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

(सहपत्र पान क्र. १५ ते २२)

ठराव :- दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या ज्ञानस्त्रोत समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

[०२] सन २०१८-१९ या वर्षाचा ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यास केंद्राचा वार्षिक अहवाल विचारार्थ.

## अ.] ज्ञानस्त्रोत केंद्राचा वार्षिक अहवाल २०१८-१९

२०१८-१९ या वर्षात विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राने खालीलप्रमाणे ग्रंथ व नियतकालिके खरेदी केलेली आहेत.

| अ.नं. | संकुल/विभाग | सन २०१८-१९ वर्षात खरेदी केलेले ग्रंथ | नियतकालिके | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | भारतीय | परदेशी | एकूण |
| १. | पदार्थ विज्ञान संकुल | ८९ | १० | ०२ | १२ |
| २. | रसायन शास्त्र संकुल | २८५ | १२ | ०२ | १४ |
| ३. | भूशास्त्र संकुल | ७४ | १८ | ०६ | २४ |
| ४. | सामाजिकशास्त्रे संकुल | ६५८ | १७ | ०७ | २४ |
| ५. | संगणकशास्त्र संकुल | ५४३ | १६ | ०७ | २३ |
| ६. | वाणिज्य व व्यवस्थान | ९११ | १३ | -- | १३ |
| ७. | भाषाशास्त्र संकुल | १८०९ | -- | -- | -- |
| ८. | ज्ञानस्त्रोत केंद्र | १२५ | -- | -- | -- |
| ९. | आरोग्य केद्र | ४९ | -- | -- | -- |
| १०. | कायदा विभाग | २३ | -- | -- | -- |
| | एकूण | ४५७४ | ८६ | २४ | ११० |

- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय तरतूद व त्यावरील झालेल्या खर्चाचा संकुलवार तपशील:- **(Development Budget Part- II)**

| Sr. No | Name of the School | Budget Provision in Rs | Books | Only Indian Jrs. Rs. | Balance of Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1. | School of Physical Sciences | 8,00,000/- | -- | 4,800/- | 7,95,200/- |
| 2. | School of Chemical Sciences | 10,50,000/- | 4,241/- | 19,800/- | 10,25,959/- |
| 3. | School of Earth Sciences | 6,00,000/- | -- | 45,500/- | 5,54,500/- |
| 4. | School of Social Sciences | 4,25,000/- | -- | 14,470/- | 4,10,530/- |
| 5. | School of Computational Sciences | 8,00,000/- | -- | 5,309/- | 7,94,691/- |
| 6. | School of Commerce & Management | 2,00,000/- | -- | 10,340/- | 1,89,660/- |
| 7. | School of Languages | 2,00,000/- | | | 2,00,000/- |
| 8. | Library (K.R.C.) | 1,00,000/- | 4000/- | | 96,000/- |
| 9. | Health Center | 40,000/- | -- | -- | 40,000/- |
| 10. | Legal Section | 50,000/- | -- | -- | 50,000/- |
| | **Total Rs.** | **42,65,000/-** | **8241/-** | **1,00,219/-** | **41,56,540/-** |

- **ग्रंथालयाकडील एकूण ग्रंथ संख्या**

| मागील ग्रंथ संख्या | नव्याने खरेदी संख्या | एकूण ग्रंथ संख्या |
|---|---|---|
| १३९८८ | ४५७४ | १८५६२ |

- **ग्रंथालयाकडे येणारी वर्तमानपत्रे व मासिके**

| वर्तमानपत्राची संख्या | मासिक/साप्ताहिकांची संख्या | एकूण वर्तमानपत्रे व मासिके |
|---|---|---|
| १४ | ९ | २३ |

- **वृत्तांत वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ**

| मागील वर्षातील ग्रंथ संख्या | चालू वर्षात मिळालेले ग्रंथ | एकूण आज अखेर मिळालेले ग्रंथ |
|---|---|---|
| ३,८६० | ------ | ३,८६० |

- **वृत्तांत वर्षात अधिविभागाकडून प्राप्त झालेले प्रकल्प अहवालांची संख्या**

| मागील वर्षातील प्रकल्प-अहवाल संख्या | चालू वर्षात मिळालेले प्रकल्प-अहवाल | एकूण |
|---|---|---|
| १,३२३ | ------ | १,३२३ |

- **बांधणी केलेल्या नियतकालिकांची एकूण संख्या :- १३५८**

- **चालू शैक्षणिक वर्षात ग्रंथालय विभागाकडून विविध उपक्रम/ कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते त्याचा तपशील :-**

- दिनांक ०९ ऑगस्ट- २०१९ रोजी ग्रंथालयाशास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्त- डॉ. बी. एन. पानगे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे ग्रंथालय (ज्ञानस्त्रोत केंद्र) साक्षरता व वापर या विषयावर विद्यापीठाकडील पदव्युत्तर वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यी, संशोधक विद्यार्थ्यी व प्राध्यापक यांच्याकरिता व्याख्यान कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

- सन-२०१८ च्या दिवाळी उत्सवात प्रकाशीत झालेल्या ३६ निवडक दिवाळी अंकाचे प्रदर्शन मा. कुलसचिव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करुन ते वाचकांना वाचनाकरिता उपलब्ध करुन देण्यात आले.

ब.] **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**अभ्यास केंद्र**

**<u>वार्षिक अहवाल २०१८-१९</u>**

प्रस्तुत विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र (रंगभवन) येथे सन २०१८-१९ या कालावधीत एकूण ४०४ विद्यार्थी व २१ विद्यार्थ्यीनी प्रवेश घेतला आहे. सदर अभ्यासकेंद्रामध्ये मुलींसाठी पहिल्या मजल्यावर स्वतंत्र व्यवस्था करुन मुलींना स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी सुविधा निर्माण केली आहे. तसेच संगणक युगाचे महत्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी पाच संगणक संच उपलब्ध करण्यात आले आहेत. तसेच येथील अभ्यासकेंद्रामध्ये सन २०१९-२० या कालावधीकरीता प्रवेश प्रक्रीया चालू आहे.

तसेच अभ्यास केंद्राच्या विद्यार्थी यांच्यासाठी ग्रंथालयाची नियमित वेळ सकाळी ०८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत आहे. तसेच विद्यार्थीनी यांच्यासाठी ग्रंथालयाची नियमित वेळ सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत आहे. या अभ्यासकेंद्रामध्ये एकूण ११०४८ इतकी क्रमिक व संदर्भीय पुस्तके उपलब्ध आहेत.

सदरच्या अभ्यासकेंद्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून रु. ६००/- वार्षीक शुल्क व फॉर्म फि रु. १०/- इतके आकारले जाते. या अभ्यासकेंद्रामध्ये ०८ वर्तमानपत्रे, ०१ साप्ताहिक व मासिके नियमित विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी उपलब्ध आहेत.

## १) <u>आगामी योजना</u>

- नियमित अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी क्रमिक पुस्तके, संदर्भीय ग्रंथ व स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणारी नवीन पुस्तके खरेदी करण्यात येणार आहेत.
- प्रस्तूत अभ्यासकेंद्रात विद्यार्थी, विद्यार्थीनी व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रसाधन गृह बांधण्याची कार्यवाही सुरु आहे.
- प्रस्तुत अभ्यासकेंद्रात वृक्षरोपण करण्याचे योजना सुरु आहे.
- विद्यार्थ्यांना अधिकची सेवा म्हणून अभ्यासकेंद्रामध्ये येणाऱ्या वेगवेगळया वर्तमानपत्रामधील नोकरीविषयक जाहिरातीची झेरॉक्स प्रत अभ्यासकेंद्राच्या नोटीसबोर्डावर लावण्याची सोय करण्यात येत आहे.

**ठराव :- ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यासकेंद्र सन २०१८-१९ या वर्षाचा वस्तूस्थिती दर्शविणारा वार्षिक अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[०३ ] सन 2019-20 या आर्थिक वर्षाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राकडील अंदाजपत्रकाचे विवरण माहीतीस्तव.**

पुस्तके व नियतकालिके याकरिता संकुलवार अंदाजपत्रकीय तरतूद.

**Development Budget- II**

| अ.क्र. | संकुलाचे नाव | अंदाजपत्रकीय तरतूद रुपये |
|---|---|---|
| १. | पदार्थ विज्ञान संकुल | 8,00,000/- |
| २. | रसायनशास्त्र संकुल | 10,50,000/- |
| ३. | भूशास्त्र संकुल | 6,00,000/- |
| ४. | सामाजिकशास्त्र संकुल | 4,25,000/- |
| ५. | संगणकशास्त्र संकुल | 8,00,000/- |
| ६. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | 2,00,000/- |
| ७. | भाषाशास्त्र संकुल | 2,00,000/- |
| ८. | ज्ञानस्त्रोत केंद्र | 1,25,000/- |
| ९. | अभ्यास केंद्र | 1,25,000/- |
| १०. | आरोग्य विभाग | 40,000/- |
| ११. | कायदा विभाग | 50,000/- |
| | **एकूण रक्कम रुपये :-** | **44,15,000/-** |

**ठराव :- सन २०१९-२० या अर्थिक वर्षाचा अंदाजपत्रकाची नोंद घेण्यात आली.**

[०४ ] सन 2019-20 या आर्थिक वर्षासाठी ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यासकेंद्रासाठी पुस्तके व नियतकालिके खरेदी करणे संदर्भातील मार्गदर्शक तत्वे ठरविण्याबाबत
(सहपत्र पान नं. २३ ते ३२)

ठराव :- १. पुस्तके व नियतकालिके खरेदीबाबत मार्गदर्शकतत्वे सन २०१९ ते २०२२ (एप्रिल २०१९ ते मार्च २०२२) या तीन वर्षासाठी असावी असे ठरविले. (सहपत्र पान क्र. २३ ते २७ व २८ ते ३२)

०५ ] **अभ्यासकेंद्राकडील मुलींच्या अभ्यासिकेची वेळ वाढविणेबाबत.**

**(सहपत्र पान नं. ३३)**

**(टिपणी ):** अभ्यासकेंद्रामध्ये मुलींची अभ्यासिका सन-२०१५ पासून सुरु आहे. या अभ्यासिकेची वेळ ही सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत आहे. परंतु मुलींच्या मागणी अर्जानुसार अभ्यासिकेची वेळ सकाळी ०८:०० ते सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत करण्यात यावी. तसेच प्रत्येक शनिवार, रविवार आणि इतर शासकीय सुट्टयांच्या दिवशी अभ्यासिका सुरु ठेवावी. ही बाब समितीच्या विचारार्थ).

ठराव :- **अभ्यास केंद्राकडील मुलींच्या अभ्यासिकेची वेळ कर्मचारी उपलब्धता पाहून मागणी प्रमाणे वेळ वाढविण्याचे विचाराधीन आहे असे सर्वानुमते ठरविले.**

## [०६] दुर्मिळ पुस्तके स्कॅनिंग करुन वापरात आणण्यासाठी विद्यापीठ संकुलातील शिक्षकांची समिती स्थापन करुन मिळणेबाबत

**(टिपणी :** पुस्तके निवडण्यासाठी त्या-त्या विषयातील विषय तज्ञांची आवश्यकता असते. जेणे करुन त्यांच्या मार्गदर्शनाने विविध विषयातील दुर्मिळ असणारी पुस्तके वापरात येऊ शकतात. याकरिता समिती गठीत करण्यासाठी विद्यापीठ संकुलातील संचालकांनी सर्व विषयांकरीता एका शिक्षकाची नेमणूक करुन द्यावी. संलग्नीत महाविद्यालयाकडील ग्रंथालयाकडे उपलब्ध असलेली दुर्मिळ पुस्तके स्कॅनींग करुन घेण्याविषयी मार्गदर्शन करावे. जेणेकरुन ज्ञानस्त्रोत केंद्राची रिपॉझिटरी समृध्द होईल. ही बाब समितीच्या विचारार्थ).

**ठराव :-** **दुर्मिळ पुस्तके स्कॅनिंग करुन वापरात आणण्यासाठी विद्यापीठ संकुलातील शिक्षकांची समिती गठीत करण्याचे सर्वानुमते ठरविले.**

**[०७ ] महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील कलम. क्र.२१ (४)(छ) नुसार विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्थाच्या ग्रंथपालाची वार्षिक बैठक आयोजित करण्याची बाब विचारार्थ.**

(**टिपणी :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील कलम.क्र.२१ (४) (छ) नुसार संलग्न महाविद्यालयाच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाच्या ग्रंथपालाची वार्षिक बैठक आयोजित करुन, विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालकाने संलग्न महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाच्या ग्रंथालयाना साहाय्य करावे आणि ग्रंथपालाना सल्ला दयावा. विचारांची देवाण घेवाण व्हावी हा हेतू असल्याने ही बाब समितीच्या विचारार्थ).

**ठराव :-** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम क्र. २१ (४) (छ) नुसार विद्यापीठ संलग्न महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्थाच्या ग्रंथपालाची वार्षिक बैठक कायम स्वरुपी घेण्याचे सर्वानुमते ठरविले.**

## [०८] ज्ञानस्त्रोत केंद्राकडील संगणक कक्षाच्या वापराबाबत

**(सहपत्र पान नं. ३४)**

**(टिपणी :** ज्ञानस्त्रोत केंद्राकडे सुसज्य अशा ५५ संगणकांचा कक्ष आहे. सध्या हा कक्ष परीक्षा विभागाच्या कामकाजासाठी वापरला जात आहे. या कक्षाची स्वच्छता व्यवस्थित केली जात नाही. धुळीमुळे संगणक बंद पडण्याची शक्यता आहे. तसेच परीक्षा विभागाकडून या कक्षातील संगणक वारंवार इकडून तिकडे हलविले जात आहे. रुसा अंतर्गत खरेदी केलेले संगणक याच कक्षात ठेवलेले आहेत. या कक्षात परीक्षा विभागाचे कामकाज चालू असल्याने तेथे जाण्यास प्रतिबंध असल्यामुळे विद्यार्थ्यांची संगणक कक्ष वापरण्याची मागणी असूनदेखील त्यांना सदर कक्ष वापरता येत नाही. त्यामुळे ज्ञानस्त्रोत केंद्राकडील संगणक कक्ष विद्यार्थ्यांना वापरता येत नाही तसेच त्याचा वापर ज्ञानस्त्रोत केंद्राकडे दाखवू शकत नाही. ही बाब समितीच्या विचारार्थ).

**ठराव :- ज्ञानस्त्रोत केंद्राकडील संगणक कक्षात परीक्षा विभागाचे काम चालते त्यासाठी परीक्षा विभागाला इतर पर्यायी जागेची सोय करता येईल का असे सर्वानुमते ठरविले.**

[९ ] **विद्यापीठामध्ये नव्याने सुरु होणाऱ्या संकुलाच्या माहितीबाबत**

**(टिपणी ) :** प्रस्तूत विद्यापीठामध्ये नविन संकुले किंवा विभाग सुरु केले जातात. उदा. कॉस्मेटीक टेक्नॉलॉजी, कन्नड, पाली अशी नव्याने सुरु झालेल्या संकुलाची/विभागाची माहिती ज्ञानस्त्रोत केंद्रास होत नाही अथवा माहिती वेळेवर दिली जात नाही. तसेच नव्याने चालू झालेल्या विषयांची पुस्तके मागविण्याबाबतची कोणतीही कार्यालयीन कार्यवाही संबंधित संकुल/विभागाकडून वेळेत होत नाही. परंतू ज्यावेळेस संबंधित विषयाच्या विद्यार्थांकडून ओळखपत्राची मागणी केली जाते. तसेच त्यांच्याकडून पुस्तकांची मागणी झाल्यास ज्ञानस्त्रोत केंद्राकडे सदरची पुस्तके उपलब्ध नसल्यास विद्यार्थ्यांची निराशा होते. तसेच पुस्तके खरेदीची कार्यवाही करण्यासाठी बराचसा अवधी जातो. संबंधित पुस्तके खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद केलेली नसल्यामुळे खरेदीची कार्यवाही करण्यास फार अडचणी येत आहे. ही बाब समितीच्या विचारार्थ).

**ठराव :- विद्यापीठामध्ये नव्याने सुरु होणाऱ्या संकुलाची माहिती प्रवेश विभागाने ज्ञानस्त्रोत केंद्राला पत्राद्वारे कळविण्याबाबत सर्वानुमते ठरले.**

[१० ]  **ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या ओळखपत्राबाबत**

**(टिपणी ) :** विद्यार्थ्यांकडून पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी तसेच संशोधक विद्यार्थी यांना विद्यापीठाचे ओळखपत्र व ज्ञानस्त्रोत केंद्राचे सभासदत्व कार्ड हे दोन्ही एकत्रितपणे ज्ञानस्त्रोत केंद्राकडून दिले जाते. हे बहुउपयोगी RFID Smart card चे अर्ज विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन स्वरुपात स्वीकारले जातात. प्राप्त ऑनलाईन माहिती संबंधित सॉफ्टवेअरमध्ये घेऊन ती माहिती योग्य असल्याची खात्री करुन संबंधित विद्यार्थ्यांना ज्ञानस्त्रोत केंद्राकडून ओळखपत्र दिली जातात. सध्या ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिली नसल्यामुळे विद्यार्थी कोणत्याही वेळेत येऊन ओळखपत्राची मागणी करीत आहेत. ओळखपत्रासाठी लागणारी कागदपत्र नसली तरीदेखील ओळखपत्र देण्याबाबत वाद घालणे असे प्रकार होत आहे.

तरी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्र अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याची अंतिम मुदत/ दिनांक द्यावे की कसे. सदरची बाब सर्व शैक्षणिक संकुलाचे संचालक यांना पत्राद्वारे कळवावे त्यानंतर जर एखाद्या संकुलाचे विद्यार्थी दिलेल्या मुदतीनंतर राहीले असतील तर रु. ५०/- इतका दंड आकारावा किंवा कसे. त्याचप्रमाणे संकुलाच्या संचालकांच्या सहीचे पत्र आणले तरच त्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र दंड आकारुन दिले जावे असे वाटते. ही बाब समितीच्या विचारार्थ**).**

**ाव :-** **ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्राचा कालावधी विद्यार्थ्यांने घेतलेल्या प्रवेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत ओळखपत्र घेणे बंधनकारक राहील. त्यानंतर येणाऱ्या विद्यार्थ्यास रुपये ५०/- दंड भरुन ओळखपत्र देण्यात येईल याबाबतच्या सूचना संबंधित संकुलाने आपापल्या विद्यार्थ्यांना द्याव्यात व सूचना नोटीस बोर्डवर लावण्यात यावेत. अस सर्वानुमते ठरले.**

**[११] ज्ञानस्त्रोत केंद्राकडून शिक्षकांना, कं. शिक्षक व कायम शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वाचनासाठी देण्यात येणा-या पुस्तकांबाबत**

**(टिपणी :** विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत ज्या प्रमाणे विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके १५ दिवसांची मुदत देऊन दिली जातात त्याच प्रमाणे विद्यापीठ परिसरातील शिक्षक, कंत्राटी शिक्षक व कायम शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पुस्तके वाचनासाठी दिली जातात. परंतू वाचनासाठी दिलेली पुस्तके वेळेवर जमा केली जात नाहीत त्यामुळे इतरांना व विद्यार्थ्यां पुस्तके उपलब्ध होत नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांकडून पुस्तके ज्ञानस्त्रोत केंद्रात उपलब्ध नसल्याची तक्रार होते. सध्या शिक्षक, कंत्राटी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या पुस्तकांची मुदत खालील तपशिलाप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | पुस्तक परत करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १. | कायम शिक्षक | ३ महिने |
| २. | कंत्राटी शिक्षक | १ महिना |
| ३. | शिक्षकेत्तर कर्मचारी | २ महिना |

उपरोक्त प्रमाणे देण्यात येणारे पुस्तक वेळेवर जमा करीत नाहीत तसेच पुस्तके वेळेवर जमा न केल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा दंड आकारला जात नाही त्यामुळे पुस्तके वेळेवर उपलब्ध होत नाही. म्हणून त्यांच्याकडून पुस्तके वेळेवर जमा होण्यासाठी, ज्ञानस्त्रोत केंद्राचा वापर वाढण्यासाठी तसेच पुस्तके इतरांना उपलब्ध होण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये पुस्तके देवघेव करणे आवश्यक आहे. तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर घेतलेली सर्व पुस्तके ज्ञानस्त्रोत केंद्राकडे जमा करणे बंधनकारक आहे. अन्यथा ग्रंथालयाच्या नियमानुसार दंड आकारावा किंवा कसे याबाबत मार्गदर्शन व्हावे. ही बाब समितीच्या विचारार्थ).

**ठराव :- ज्ञानस्त्रोत केंद्राकडून शिक्षकांना, कं. शिक्षक व कायम कर्मचारी यांना वाचनासाठी देण्यात येणाऱ्या पुस्तकांचा कालावधी पुढीलप्रमाणे असावा असे सर्वानुमते ठरविले.**

| अ.क्र. | पदनाम | पुस्तक परत करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १. | कायम शिक्षक | ६ महिने |
| २. | कंत्राटी शिक्षक | ३ महिने |
| ३. | शिक्षकेत्तर कर्मचारी | २ महिने |

**तसेच कामय शिक्षकांनी चालू शैक्षणिक वर्षामध्ये किमान एक वेळा पुस्तके जमा करणे अपेक्षित आहे. तर इतर कर्मचाऱ्यांनी विहीत कालावधीमध्ये पुस्तके जमा करावीत. अन्यथा त्यांना ज्ञानस्त्रोत केंद्राच्या पुस्तक दंडाच्या नियमानुसार शुल्क आकारण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.**

[१२] मा. अध्यक्षा यांच्या परवानगीने आयत्यावेळीचे विषय.

1) **Common Account Code- Cha 6: Procurement of Goods & Services Page-72 &73** अधिनियम क्र. 194 अन्वये पुस्तक संख्येनुसार ज्ञानस्त्रोत केंद्राची पुस्तकांची साठा पडताळणी नियमानुसार करावी असे. मा. सीए. श्रेणिक शाह वित्त व लेखा अधिकारी यांनी आयत्या वेळीच्या विषयामध्ये विस्तृत चर्चा केली व त्यांची आवश्यकता व महत्व यावर चर्चा झाली. ज्ञानस्त्रोत केंद्राच्या कार्यालयास अशा पडताळणीचा मोठा फायदा होऊ शकतो. त्यामुळे अशी पडताळणी करुन घेणे गरजेचे असल्याचे सर्वानुमते ठरले.

२) पुस्तके व नियतकालिके खरेदीसाठी **Acquisition Policy** समिती गठीत करावी. सदर कमिटीने नियतकालिके व पुस्तके खरेदी मार्गदर्शक तत्तवे तयार करुन मंजूर करुन घ्यावेत. असे मा. सीए. श्रेणिकशाह वित्त व लेखा अधिकारी यांनी सुचविले व त्यावर सविस्तर चर्चा झाली. त्यासाठी समिती गठीत करण्याचे सर्वानुमते ठरविले.

11-11-19

सचिव
संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र

14.11.19

अध्यक्षा
मा. कुलगुरु महोदया

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या २२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

ज्ञानस्त्रोत केंद्र समितीची २२ वी बैठक दिनांक १५/०९/२०२० रोजी सकाळी ११:३० वाजता Google Meet App व्दारे ऑनलाईन मा. कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. मृणालिनी फडणवीस, मा. कुलगुरु महोदया | अध्यक्ष |
| २. | डॉ. डी.डी. कुलकर्णी | सदस्य |
| ३. | श्री.राम रेडडी | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. बी. म. पानगे | सदस्य |
| ५. | प्रा. डॉ. वि. भा. घुटे, मा. कुलसचिव | सदस्य |
| ६. | सीए. श्रेणिक शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ७. | प्रा. डॉ. श. शि. सुर्यवंशी | सचिव |

**स्वागत :**

प्र. संचालक तथा सचिव, ज्ञानस्त्रोत केंद्र समिती यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने या बैठकीचा कामकाजास सुरुवात केली व त्यांनी मा. अध्यक्ष व ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती :**

ज्ञानस्त्रोत केंद्र समितीचे सदस्य प्राचार्या, डॉ. के. ए. पांडे यांनी काही अपरिहार्य कारणास्तव सदर बैठकीस उपस्थित राहू शकणार नसल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

[०१]	दि. २३ ऑक्टोबर २०१९ रोजी झालेल्या ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यालयाने त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव	दि. २३ ऑक्टोबर २०१९ रोजी झालेल्या ज्ञानस्त्रोत केंद्र समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यालयाने त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

## [०२] सन २०१९-२० या वर्षाचा ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यास केंद्राचा वार्षिक अहवाल विचारार्थ .

### अ.] ज्ञानस्त्रोत केंद्राचा वार्षिक अहवाल २०१९-२०

अहवाल वर्षात विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राने खालीलप्रमाणे ग्रंथ व नियतकालिके खरेदी केलेली आहेत.

| अ.नं. | संकुल/ विभाग | सन २०१९-२० या अहवाल वर्षात खरेदी केलेले ग्रंथ | | नियतकालिके | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भारतीय | परदेशी | एकूण |
| १. | पदार्थ विज्ञान संकुल | ०६ | | १० | ०२ | १२ |
| २. | रसायनशास्त्र संकुल | ७४ | | ०२ | १४ | १६ |
| ३. | भूशास्त्र संकुल | ७८ | | ११ | ०५ | १६ |
| ४. | सामाजिक शास्त्र संकुल | १०७ | | १६ | ०३ | १९ |
| ५. | संगणकशास्त्र संकुल | ७१ | | १२ | ०६ | १८ |
| ६. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | १६० | | १९ | -- | १९ |
| ७. | भाषाशास्त्र संकुल | मराठी | ८९ | हिंदी-०९ | -- | २१ |
| | | हिंदी | ६८ | | | |
| | | इंग्रजी | १८४ | | | |
| | | संस्कृत | ५७ | | | |
| | | पाली | १५६ | | | |
| | | ऊर्दू | १५७ | मराठी-१२ | | |
| ८. | ज्ञानस्त्रोत केंद्र | ०८ | | -- | -- | -- |
| ९. | आरोग्य केंद्र | ३९ | | -- | -- | -- |
| १०. | कायदा विभाग | ०८ | | -- | -- | -- |
| | एकुण | १२६२ | | ९१ | ३० | १२१ |

- **सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय तरतूद व त्यावरील झालेल्या खर्चाचा संकुलवार तपशील:- (Development Budget Part- II)**

| Sr. No | Name of the School | Budget Provision in Rs | Books | Only Jrs. Rs. | Balance of Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1. | School of Physical Sciences | 9,00,000/- | -- | 9,00,000/- | 0/- |
| 2. | School of Chemical Sciences | 10,50,000/- | -- | 9,99,059/- | 50,941/- |
| 3. | School of Earth Sciences | 6,00,000/- | 2,82,883/- | 2,61,253/- | 55,864/- |
| 4. | School of Social Sciences | 4,25,000/- | 2,12,648/- | 1,23,120/- | 89,232/- |
| 5. | School of Computational Sciences | 8,00,000/- | 3,25,608/- | 4,38,779.6/- | 35612.4/- |
| 6. | Languages | 2,00,000/- | 1,34,034/- | 15,460/- | 50506/- |
| 7. | School of Commerce & Management | 2,00,000/- | 63,536/- | 41,269/- | 95195/- |
| 8. | Knowledge Resource Centre (Library) | 1,25,000/- | 42,005/- | -- | 82,995/- |
| 9. | Study Centre | -- | -- | -- | -- |
| 10. | Health Center | 40,000/- | 1000/- | -- | 39,000/- |
| 11. | Legal Section | 50,000/- | 35,840/- | -- | 14,160/- |
| 12. | UGC 12th Plan | 76,614/- | 76,583/- | | 31/- |
| | **Total Rs.** | **44,66,614/-** | **11,74,137/-** | **27,78,941/-** | **5,13,536/-** |

- **ग्रंथालयाकडील एकुण ग्रंथ संख्या**

| मागील वर्षातील ग्रंथ संख्या | नव्याने खरेदी संख्या | एकुण ग्रंथ संख्या |
|---|---|---|
| २८,५६८ | ११०५ | २९,६७३ |

- **ग्रंथालयाकडे येणारी वर्तमानपत्रे व मासिके**

| वर्तमानपत्रांची संख्या | मासिके /साप्ताहिकांची संख्या | एकुण वर्तमानपत्रे व मासिके |
|---|---|---|
| १४ | ०९ | २३ |

- **वृत्तांत वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ**

| मागील वर्षातील ग्रंथ संख्या | चालू वर्षात मिळालेले ग्रंथ | एकुण आज अखेर मिळालेले ग्रंथ |
|---|---|---|
| ३,८६० | ३८५ | ४२४५ |

- **वृत्तांत वर्षात अधिविभागाकडून प्राप्त झालेले प्रकल्प अहवालांची संख्या**

| मागील वर्षातील प्रबंध संख्या | चालू वर्षात मिळालेले प्रबंध संख्या | प्रबंध संख्या एकुण |
|---|---|---|
| १,३२३ | ५१ | १,३७४ |

- सन २०१९-२० या चालु शैक्षणिक वर्षामधील विद्यापीठातील पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी, संशोधक व शिक्षक यांना एकुण ७५० इतके ओळख पत्र (RFID- Smart Card) देण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली आहे.
- शैक्षणिक संशोधन आणि विकास विभागाकडुन पीएच.डी शोधप्रबंधाचे Plagiarism Report तपासून त्याचा अहवाल देण्यात आला.
- १२ प्लॅन युजीसी अनुदानातून पुस्तकांची खरेदी करण्यात आली आहे.
- दिव्यांगासाठी श्राव्य सीडी व ब्रेल पुस्तकांची खरेदी करण्यात आली आहे.

**अभ्यासकेंद्र:-**

१. अभ्यासकेंद्रामध्ये (रंगभवन) सन २०१९-२० या कालावधीत एकुण ३७२ विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेसाठी प्रवेश घेतला आहे.
२. अभ्यासकेंद्रामध्ये विद्यार्थी व विद्यार्थीनी वाचकांसाठी वेगळी बैठक व्यवस्थेची सोय करण्यात आली आहे.
३. अभ्यासकेंद्रामध्ये ९ वर्तमानपत्रे व ७ मासिके उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.
४. विद्यार्थ्यांना अधिकची सेवा म्हणून अभ्यास केंद्राकडे येणा-या वेगवेगळया वर्तमानपत्रामधील नोकरी विषयक जाहिरातींची झेरॉक्स प्रत अभ्यास केंद्राच्या नोटीस बोर्डवर लावण्याची सोय करण्यात येत आहे.

- **ज्ञानस्त्रोत केंद्राकडील सेवा व सुविधा -**

१. वर्तमानपत्रातील बातम्यांचे कात्रण
२. ज्ञानस्त्रोत केंद्राचे ओळखपत्र (RFID Smart Cards)
३. ऑनलाईन पुस्तक देवाण - घेवाण सेवा
४. संदर्भ व माहिती सेवा
५. नियतकालिके प्रकल्प / प्रबंध सेवा
६. झेरॉक्स, स्कॅनिंग, कलर प्रिंट इ. सुविधा
७. इंटरनेट सुविधा
८. विद्यापीठाच्या सेमीस्टर परिक्षेच्या कालावधीत अभ्यासाची वेळ वाढविले जाते.
९. इ-संसाधने सुविधा.
१०. विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विविध प्रकारचे सॉफ्टवेअर

1. Ezproxy 2. FedGate 3. D Space

११. दिव्यांगासाठी बोलणारी पुस्तक CD's (Talking books) - ८३६
१२. सुगम्य पुस्तकालयाचे सदस्यत्व.

**ठराव** **सन २०१९-२० या वर्षाचा ज्ञानस्त्रोत केंद्र व अभ्यास केंद्राचा वस्तुस्थिती दर्शविणा-या वार्षिक अहवालाची नोंद घेण्यात आली.**

[०३] सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राकडील अंदाजपत्रकाचे विवरण माहीतीस्तव.

**पुस्तके व नियतकालिके याकरिता संकुलवार अंदाजपत्रकीय तरतूद.**

**Development Budget- II**

| अ.क्र. | संकुलाचे नाव | अंदाजपत्रकीय तरतूद रुपये |
|---|---|---|
| १. | पदार्थ विज्ञान संकुल | 12,00,000/- |
| २. | रसायनशास्त्र संकुल | 12,00,000/- |
| ३. | भूशास्त्र संकुल | 8,00,000/- |
| ४. | सामाजिकशास्त्र संकुल | 4,25,000/- |
| ५. | संगणकशास्त्र संकुल | 10,00,000/- |
| ६. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | 2,00,000/- |
| ७. | भाषाशास्त्र संकुल | 8,00,000/- |
| ८. | ज्ञानस्त्रोत केंद्र | 2,00,000/- |
| ९. | अभ्यास केंद्र | 1,25,000/- |
| १०. | आरोग्य विभाग | 40,000/- |
| ११. | कायदा विभाग | 50,000/- |
| १२. | ललित कला व कला संकुल | 1,00,000/- |
| १३. | तंत्रज्ञान संकुल | 1,00,000/- |
| १४. | स्कूल ऑफ अलाईड हेल्थ सायन्सेस | 1,00,000/- |
| | **एकूण रक्कम रुपये :-** | **63,40,000/-** |

ठराव

**Development Budget- II**

| अ.क्र. | संकुलाचे नाव | अंदाजपत्रकीय तरतूद रुपये |
|---|---|---|
| १. | पदार्थ विज्ञान संकुल | 12,00,000/- |
| २. | रसायनशास्त्र संकुल | 10,00,000/- |
| ३. | भूशास्त्र संकुल | 8,00,000/- |
| ४. | सामाजिकशास्त्र संकुल | 4,25,000/- |
| ५. | संगणकशास्त्र संकुल | 10,00,000/- |
| ६. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | 2,00,000/- |
| ७. | भाषाशास्त्र संकुल | 8,00,000/- |
| ८. | ज्ञानस्त्रोत केंद्र | 2,00,000/- |
| ९. | अभ्यास केंद्र | 1,25,000/- |
| १०. | आरोग्य विभाग | 40,000/- |
| ११. | कायदा विभाग | 50,000/- |
| १२. | ललित कला व कला संकुल | 1,00,000/- |
| १३. | तंत्रज्ञान संकुल | 1,00,000/- |
| १४. | स्कूल ऑफ अलाईड हेल्थ सायन्सेस | 1,00,000/- |
| १५. | लाईफ सायन्स | 2,00,000/- |
| | **एकूण रक्कम रुपये :-** | **63,40,000/-** |

**रसायनशास्त्र संकुलाकडील अंदाजपत्रकीय तरतुदीमधील २,००,०००/- रुपये कमी करुन लाईफ सायन्स संकुलासाठी २,००,०००/- रुपये तरतुद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

1] Allottment रजिस्टरला सदर Budget ची नोंद घेण्यात आली.

2] रसायनशास्त्र संकुल/ लाईफ सायन्स संकुल/ वित्त व लेखा विभाग यांना दि. 3/12/20 रोजीच्या ION द्वारे कळविले आहे.

**[०४] एम.फिल. व पीएच.डी. शोधप्रबंधाचे वाङ्‌मयचौर्य शोधण्यासाठी नवीन Anti-Plagiarism Software खरेदी करणेबाबत.**

**(टिपणी :** ज्ञानस्त्रोत केंद्राकडे विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून मिळालेले Urkund हे Anti Plagiarism Software हे आहे. हे Software २०१२ -२०१३ पासून ज्ञानस्त्रोत केंद्राकडून पीएच.डी. शोधप्रबंधातील वाङ्‌मयचौर्य शोधण्यासाठी वापरले जाते. परंतु सध्या असे लक्षात आले आहे की, सखोल Plagiarism तपासले जात नाही. त्यामुळे सदरचे Software हे Plagiarism शोधण्यास असमर्थ टरत आहेत.

तरी दुसरे एखादे Anti Plagiarism Software खरेदी करावे असे वाटते सध्या बाजारामध्ये विविध प्रकारची Software आहेत. Anti Plagiarism Software बद्दल ब-याच विद्यापीठामध्ये चौकशी केली असता त्यांच्याकडे iThenticate Plagiarism Software आहे असे निर्दशनास आले आहे.

- Software खरेदी करत असताना किती Users करीता खरेदी करावे.
- Affiliated College च्या संशोधकांचे प्रबंध व शोधनिबंध तपासून देताना फी आकारावी किंवा कसे.

  या सर्व बाबी लक्षात घेता सदरचा विषय समितीच्या विचारार्थ.

ठराव **१) iThenticate Plagiarism Software खरेदी करण्याचे ठरले.**

**२) परीसरातील, संलंग्नीत महाविद्यालयातील व इतर संशोधकांचे प्रबंध व शोधनिबंध तपासून देण्याकरीता शुल्क आकारायचे शुल्क हे शुल्क निर्धारण समितीकडून निश्चीत करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले.**

**३) सदर iThenticate Plagiarism Software चे दर प्रती वर्षी ६ टक्केने वाढणार आहेत.**

**४) शुल्क निर्धारण करीत असताना प्रती वर्षी १० टक्के शुल्क वाढ करावी असे सर्वानुमते ठरले.**

**[०५] आरोग्य विभाग व कायदा विभाग यांना कायमस्वरुपी दिलेली पुस्तके परत घेण्याबाबत.**

**(टिपणी :** आरोग्य विभाग व कायदा विभागासाठी ज्ञानस्त्रोत केंद्राकडे पुस्तके व नियतकालिके खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रकीय तरतुद केलेली आहे. त्याअंतर्गत ज्ञानस्त्रोत केंद्राकडून पुस्तकांची खरेदी केली जाते. परंतु सन २०१८ पासून ज्ञानस्त्रोत केंद्राकडून खरेदी केलेली पुस्तके या दोन्ही विभागाने सहपत्रामध्ये जोडलेल्या पत्रानुसार कायमस्वरुपी वर्ग करुन घेतली आहे. जेव्हा नवीन पुस्तके खरेदी केली जातात, ती पुस्तके सर्व प्रक्रिया केल्यानंतर सदर विभागांना वर्ग केली जातात. त्यांच्या मागणीचे पत्र सोबत जोडले आहे. याकरीता खालील बाबी महत्वाच्या ठरतात.

१) ज्ञानस्त्रोत केंद्रातुन व त्यांच्याकडील अंदाजपत्रकीय तरतुदीतून खरेदी केलेली पुस्तके ही ज्ञानस्त्रोत केंद्रातच राहणे योग्य राहील.

२) सध्या बायोटेक्नॉलॉजी, कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी, एम.बी.ए. या विभागास काही अंशी अनुक्रमे आरोग्य व कायदा विभागाची पुस्तके आवश्यक असतात. तशी मागणी संबंधित शिक्षकांकडून येत असते.

३) पुस्तके देवाण-घेवाण करण्यासाठी व पुस्तकांचा वापर दिसून येण्यासाठी पुस्तकांची देव-घेव होणे आवश्यक असते. यामुळे ज्ञानस्त्रोत केंद्रातील वाचकांचा ओघ वाढण्यास मदत होते.

तरी वरील बाबी विचारात घेता, आरोग्य विभाग व कायदा विभागाकडील सर्व पुस्तके ज्ञानस्त्रोत केंद्राकडे परत घेण्याची बाब विचारार्थ.

ठराव **आरोग्य विभाग व कायदा विभाग यांना कायमस्वरुपी दिलेली पुस्तके परत ज्ञानस्त्रोत केंद्राकडे घेण्याचे सर्वानुमते ठरले.**

* संबंधितांना पुस्तके परत ज्ञानस्त्रोत केंद्राकडे जमा करणेबाबत संदर्भ पत्र क्र. पुअहोयोवियो/ज्ञानस्त्रोत केंद्र/2020/77 दि. 20 NOV 2020 अन्वये कळविलेले आहे.

**[०६] Web of Science किंवा Scopus Database खरेदी करणेबाबत.**

**(टिपणी :** मा.कुलगुरु महोदया यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार Web of Science किंवा Scopus Database खरेदी करावे असे सूचित करण्यात आले होते. त्यानुसार इतर विद्यापीठे व Web of Science आणि Scopus यांच्याशी संवाद साधला त्याप्रमाणे दोन्हीही फर्मने माहितीस्तव ईमेल व दरपत्रके पाठविली आहेत. Web of Science ने Online Training ही दिले आहे. Scopus ने Online Training देण्यास तयार आहेत. सदरचे दोन्ही Database हे Abstract, Ciatation, Indexing, Database आहेत. दोन्हीचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.

दोन्ही Database ची तुलना करुन कोणता Database आपल्या विद्यापीठाकरीता योग्य आहे व कोणता खरेदी करावे याबाबत मार्गदर्शन करावे. सदरच्या Database ची किंमत लक्षात घेता खरेदी करीता कोणत्या अंदाजपत्रकीय तरतुदीचा वापर करावा हे सूचित करावे. ही बाब समितीच्या विचारार्थ.)

**ठराव** **Scopus हा Abstract, Ciatation, Indexing, Database आहे. सारासार विचार करता त्यांची वार्षिक शुल्कही जास्त आहे. सद्यस्थितीमध्ये खरेदी करु नये असे सर्वानुमते ठरले.**

22-09-2020

**सचिव**
**संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र**

M. Fodnavis 24.09.2020

**अध्यक्ष**
**मा. कुलगुरु महोदया**